आयुर्वेद सेवा समिती, यवतमाळ द्वारा संचालित
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्नित
महाराष्ट्र शासन अनुदानित

**डायाभाई मावजी मजिठीया आयुर्वेद महाविद्यालय व लक्ष्मणराव कळसपूरकर आयुर्वेद रुग्णालय, यवतमाळ**

शिवाजी नगर, यवतमाळ–४४५००१ (महाराष्ट्र)

फोन नंबर : ०७२३२ २४३८९६ (कॉलेज)
०७२३२ २४५८९६ (रुग्णालय)

Website : dmmamy.in
Email : pridmmamytl@rediffmail.com

जावक क्रमांक : 1878 — दिनांक : 30/09/2020

प्रति,
मा.संचालक
आयुष संचालनालय
मुंबई

विषय :– राष्ट्रीय पोषण अभियान कार्यक्रमाचा अहवाल सादर करणेबाबत.
संदर्भ :– आपले पत्र क. आसंमु/पोषणमाह/2020/9278 दि. 07.09.2020.

मा. महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या वरील संदर्भीय प्रत्रानुसार माहे सप्टेंबर 2020 हा महिना पोषण महिना म्हणून साजरा करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार

1) दि. 09.09.2020 रोजी वरील संदर्भीय पोषण अभियानाचे नियोजनासाठी मा. प्राचार्य, डा.मा.म. आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ यांचे मार्गदर्शनात प्राचार्य कार्यालयात सभा घेण्यात आली. या सभेसाठी वैद्य प्रदिपकुमार गिरी, सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख स्त्रीरोग प्रसुतीतंत्र विभाग, उपप्राचार्य वैद्य समीर बेलोरकर, सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, द्रव्यगुण विभाग, वैद्य मनोज येरावार, सहायक प्राध्यापक, स्वस्थवृत्त विभाग तसेच वैद्या प्रिती माकडे, सहायक प्राध्यापक, स्त्रीरोग विभाग, वैद्या पी.एस. जमधाडे, सहायक प्राध्यापक, द्रव्यगुण विभाग आदी उपस्थित होते. मा. प्राचार्य यांचे निर्देशानुसार दि. 28.09.2020 रोजी गरोदर महिला, स्तनदा माता, किशोरवयीन मुली आणि लहान मुले यांना आरोग्य आणि पोषणाचे महत्व पटवून देणेकरीता वेबिनार आयोजन करण्याचे ठरले.

2) दि. 28.09.2020 रोजी सकाळी नियोजित वेळेनुसार 10.00 वाजता वेबिनार सुरू झाला. सुरुवाती पासूनच गरोदर महिला, स्तनदा माता, किशोरवयीन मुली आणि लहान मुलांचे पालक यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

संपुर्ण वेबिनारचे नियोजन वैद्या प्रिती माकडे व वैद्या पी.एस. जमधाडे यांनी केले. वेबिनारची सुरूवात व संचलन वैद्या प्रिती माकडे यांनी केले. मा. श्री. सुभाष राठोड, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा वाशिम हयांनी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शनामध्ये पोषण संबंधी विविध शासकीय योजना व त्यांची अमलबजावणी तसेच समाजामध्ये पोषणाचे महत्व पटवून दिले.

वक्ते म्हणून वैद्य पी.बी. गिरी, स्त्रीरोग विभाग प्रमुख यांनी "आरोग्य आणि पोषण" तसेच वैद्य एस. एम. बेलोरकर, द्रव्यगुण विभाग प्रमुख यांनी "पोषणासाठी उपयुक्त वनौषधी व आहारद्रव्य" या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर मा. वैद्य राजीवजी मुंदाने, प्राचार्य, डा.मा.म. आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये आरोग्य व पोषणा संबंधी मार्गदर्शन केले. वेबिनारची सांगता वैद्या पी.एस. जमधाडे यांनी करून आभारप्रदर्शन केले.


अशाप्रकारे राष्ट्रीय पोषण अभियान कार्यक्रम राबविण्यात आला.
करींता आपल्या माहितीस्तव सादर.


आपला विश्वासू

**प्राचार्य**
**डा.मा.म.आयुर्वेद महाविद्यालय**
**यवतमाळ**

सहपत्र :–
वेबिनारचे निवडक छायाचित्रे

## वेबिनारचे छायाचित्रे






प्राचार्य
डा.मा.म.आयुर्वेद महाविद्यालय
यवतमाळ




प्राचार्य
डा.मा.म.आयुर्वेद महाविद्यालय
यवतमाळ